# Criteria VI

**6.1.2: The effective leadership is visible in various institutional practices such as decentralization and participative management.**

Ref. No. : AMA/ Date / /

Scanned with CamScanner

## 6.1.2 The effective leadership is visible in various institutional practices such as decentralization and participative management


| SN | Particulars | Page No. |
|---|---|---|
| 1 | University letter for degree distribution Programme | 1-8 |
| 2 | Notice to Staff and Students about degree distribution Programme | 9-9 |
| 3 | committee form for degree programme | 10-12 |
| 4 | Letters to Guest | 13-14 |
| 5 | Programme brochure & Sheet | 15-16 |
| 6 | Photographs of degree Programme | 17-17 |
| 7 | News clippings of degree programme | 18-19 |
| 8 | Thanking letters to guest | 20-21 |

|| सा विद्या या विमुक्तये ||

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)

## SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)

Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'B' Grade

### EXAMINATION (CONVOCATION) SECTION

| Phone: (02462) 229242<br>Fax No. (02462) 229250 | Website:<br>www.srtmun.ac.in | E-mail:<br>directorboeer@gmail.com |
|---|---|---|


Ref: Convo/2020-21/ 12120 Date: 19/08/2020

:: परीपत्रक ::

प्रति,
मा.प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

विषय : बावीसाव्या दीक्षांत समारंभाच्या अनुषंगाने महाविद्यालय स्तरावर पदवी वितरण कार्यक्रम आयोजित करणे बाबत.

संदर्भ : या कार्यालयाचे दिनांक २८.०८.२०१९ रोजीचे परीपत्रक.

मोहदय,

वरील विषयी संदर्भीय परीपत्रका नुसार आपणास कळविण्यात येते की, संलग्नित सर्व महाविद्यालयांने पदवी वितरण कार्यक्रम आयोजित करणे बाबत कळविण्यात आलेले होते.

विद्यापीठाच्या परीक्षेत्रातील चार ही जिल्हयातील कांही महाविद्यालयांनी कार्यवाही केलेली आहे. ब—याच महाविद्यालयांनी विद्यापीठाच्या दीक्षांत विभागाकडून पदवी प्रमाणपत्र घेतली आहेत, परंतू अद्याप पर्यंत महाविद्यालय स्तरावर आयोजित करण्यात येणारा पदवी वितरण कार्यक्रम आयोजित केलेला नसल्याचे निर्दशनास आले आहे. पदवी वितरण कार्यक्रम न घेणा—या महाविद्यालयांना कळविण्यात येते की, दिनांक ३०/०८/२०२० पर्यंत पदवी वितरण कार्यक्रम घेवून त्वरीत पदवी वितरणं अहवाल कार्यक्रमाच्या छायाचित्रासह दीक्षांत विभागाकडे सादर करावा.

विद्यापीठाशी संलग्नित अनेक महाविद्यालयांनी पदवी वितरण कार्यक्रमाचे आयोजन केलेल आहे, परंतू अद्याप पर्यंत त्याचे अहवाल दीक्षांत विभागाकडे पाठविलेले नाहीत, अशा महाविद्यालयांनी देखील पदवी वितरण कार्यक्रमाचे अहवाल छायाचित्रासह दीक्षांत विभागाकडे दिनांक ३०/०८/२०२० पर्यंत सादर करावा.

दीक्षांत विभागाकडून अद्याप पर्यंत महात्मा बसवेश्वर महाविद्यालय,लातुर, आझाद महाविद्यालय औसा व के.के.एम.महाविद्यालय,मानवत या महाविद्यालयांनी पदवी प्रमाणपत्र घेवून गेलेले नाहीत अशा महाविद्यालयांनी या बाबत खुलासा सादर करावा व त्वरीत पदवी प्रमाणपत्र हस्तगत करुन दिं.३०/०८/२०२० पर्यंत पदवी वितरण कार्यक्रमाचे आयोजन करुन त्याबाबतचा अहवाल कार्यक्रमाच्या छायाचित्रासह दीक्षांत विभागाकडे सादर करावा.

वरील प्रमाणे महाविद्यालय स्तरावर पदवी वितरण कार्यक्रम हा कोव्हिड—२०१९ या विषाणुचा प्रार्दुभाव टाळण्यासाठी केंद्रशासन, राज्य शासन ,उच्च व तंत्र शिक्षण विभाग व प्रस्तुत विद्यापीठाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सुचनेनुसार योग्य ती खबरदारी घेवून आयोजित करण्यात यावा, कळावे.

संचालक,
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

प्रत माहितीस्तव:
मा. कुलगुरु प्रस्तुत विद्यापीठ.
मा. प्र—कुलगुरु प्रस्तुत विद्यापीठ.

॥ या विद्या या विमुक्तये ॥
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED
"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)
Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

Phone : (02462) 229294
Fax : (02462) 229520

OFFICE OF THE DIRECTOR BOE&E

Website: srtmun.ac.in
E-mail: directorboee@srtmun.ac.in

जा.क्र.परीक्षा/संपवमूमं/२०१९–२०/१२८७ दिनांक :२६/०८/२०१९.

## परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य,
सर्व संलग्नीत महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

विषय : महाविद्यालय स्तरावर पदवी प्रमाणपत्राचे वितरण समारंभ आयोजित करणे बाबतची कार्यपध्दती.

संदर्भ : उच्च व तंत्रशिक्षण विभाग,मंत्रालय मुंबई यांचे दि. १० ऑक्टोंबर २०१८ रोजीचे एकरुप परिनियम क्र. ०४

महोदय,

उपरोक्त विषय व संदर्भीय पत्रान्वये आपणास कळविण्यात येते की, मा.कुलगुरु महोदयांचे अध्यक्षतेखाली सर्व विद्याशाखांचे अधिष्ठातांची बैठक संपन्न झाली व त्यामध्ये संदर्भीय महाराष्ट्र शासनाने निर्गमीत केलेल्या राजपत्रातील एकरुप परिनियम क्र. ०४ नुसार महाविद्यालय स्तरावर "पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ " बाबतची कार्यपध्दती तयार करण्यात आली असुन ती या पत्रासोबत जोडण्यात आलेली आहे. त्यांचे अवलोकन करुन त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

प्रस्तुत विद्यापीठाचा आगामी दीक्षांत समारंभात केवळ पीएच.डी पदवी धारक विद्यार्थी तसेच सुवर्णपदक प्राप्त विद्यार्थी व प्रस्तुत विद्यापीठातील सर्व संकुले,उपकेंद्र लातूर व न्यू मॉडेल कॉलेज, हिंगोली येथील उत्तीर्ण विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र वितरीत करण्यात येईल त्यामुळे संलग्नीत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना उपरोक्त दीक्षांत समारंभामध्ये विद्यापीठात पदवी प्रमाणपत्र देण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

करीता सर्व संलग्नीत महाविद्यालयातील पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभाचे आयोजन करतांना सोबतच्या कार्यपध्दतीचे काटेकोरपणे पालन करुन पदवी वितरण समारंभ यशस्वीरित्या पार पाडण्यात यावा.

कळावे,

आपला,

संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत माहितीस्तव सादर :
मा. कुलगुरु महोदय,प्रस्तुत विद्यापीठ
मा.प्र–कुलगुरु महोदय,प्रस्तुत विद्यापीठ

।। सा विद्या या विमुक्तये ।।
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED
"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)
Established on 17th September 1994 Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade
OFFICE OF THE DIRECTOR BOE&E
Website: srtmun.ac.in
E-mail: directorboee@srtmun.ac.in
Phone : (02462) 229294
Fax : (02462) 229520

## प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालयामध्ये महाविद्यालय स्तरावर "पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभासाठी" अनुसरावयाची कार्यपध्दती

१. पदवी प्राप्त करणे हे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनातील महत्वाचा व परमोच्च क्षण असुन त्यासाठी सर्व पदवीप्राप्त विद्यार्थ्यांना त्यांची पदवी सन्मानपुर्वक देण्यासाठी वरील परिनियमानुसार "पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ" हा संलग्नीत महाविद्यालयात आयोजित करण्यात यावा. सदर समारंभ विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ संपन्न झाल्यावर एक महिन्याच्या आत सर्व संलग्नीत महाविद्यालयामध्ये आयोजित करण्यात यावा.

२. महाविद्यालय स्तरावर पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ आयोजित करतांना तो विद्यापीठाच्या समारंभा सारखा तसेच Code of conduct मध्ये आयोजित करतांना त्याचे पावित्र्य जपण्याची जबाबदारी महाविद्यालय प्रशासनाची राहील.

३. महाविद्यालयाने सदर समारंभाचे आयोजन करतांना पदवीप्राप्त करणा—या विद्यार्थ्यांची संख्या लक्षात घेवुन त्यानुसार सभागृह किंवा सोईच्या ठिकाणी समारंभाचे आयोजन करावे.

४. पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभातच सर्व प्रमाणपत्रे वितरित होतील अशा प्रकारचे नियोजन महाविद्यालय प्रशासनाने करावे.

५. विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ संपन्न झाल्यानंतर त्या—त्या विद्यार्थ्यांचे पदवी प्रमाणपत्रे विद्यापीठातुन हस्तागत करण्यासाठी कळविण्यात येईल.

६. महाविद्यालयाने पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभानंतर वाटप होवुन उर्वरित राहिलेले प्रमाणपत्र महाविद्यालयात ठेवुन ती विद्यार्थ्यांना त्या त्या शैक्षणिक वर्षात वितरीत करावीत परंतू पुढील दीक्षांत समारंभ होण्यापुर्वी एक महिन्यापुर्वी शिल्लक राहिलेली सर्व प्रमाणपत्रे वितरणाच्या हिशोबासह विद्यापीठाच्या दीक्षांत कक्षात सादर करणे सर्व महाविद्यालयास बंधनकारक राहील.

Website: srtmun.ac.in
E-mail: directorboee@srtmun.ac.in
: (02462) 229294
: (02462) 229520



७. जे विद्यार्थी वरील मुददा क. ०६ नुसार महाविद्यालयातुन पदवी प्रमाणपत्र हस्तगत करणार नाहीत त्यांना विद्यापीठाच्या दीक्षांत कक्षामधुन पदवी प्रमाणपत्र प्राप्त करता येईल, परंतू त्यासाठी त्यांना २०० रु एवढे विलंब शुल्क आकारुन पदवी प्रमाणपत्र देण्यात येईल.

८. महाविद्यालय स्तरावर पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ आयोजित करण्यासाठी संबंधीत महाविद्यालयातील प्राप्त होणा—या एकुण पदवी प्रमाणपत्राच्या विद्यार्थी संख्येनुसार प्रति विद्यार्थी रु.२० प्रमाणे प्रशासकीय खर्च महाविद्यालयास देय असेल.

९. पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ याबाबत विद्यार्थ्यांची पदवी प्रमाणपत्रे विद्यापीठातुन हस्तगत करणे, वितरण करणे, शिल्लक प्रमाणपत्रांची विद्यापीठाच्या पुढील दीक्षांत समारंभापर्यंत सुरक्षितता व देखभाल करणे याबाबतची संपुर्ण जबाबदारी महाविद्यालयाची राहील. महाविद्यालयात समारंभ पार पाडल्यानंतर महाविद्यालयात शिल्लक राहीलेली पदवी प्रमाणपत्रे विद्यापीठाच्या पुढील वर्षी होणा—या दीक्षांत समारंभापुर्वी एक महिना अगोदर विद्यापीठात वितरणाच्या हिशोबासह सादर करावेत.

१०. विद्यापीठाच्या मुख्य दीक्षांत समारंभात केवळ सुवर्णपदक प्राप्त विद्यार्थ्यांना सुवर्णपदक व त्यांचे पदवी प्रमाणपत्रे प्रदान करण्यात येतील तसेच विद्यापीठ संकुले, उपकेंद्र लातूर,परभणी, न्यू मॉडेल कॉलेज हिंगोली,किनवट येथील विद्यार्थ्यांचे पदवी प्रमाणपत्रे व पीएच.डी प्राप्त विद्यार्थ्यांचे पदवीप्रमाणपत्रे दुपारच्या सत्रामध्ये वितरीत करण्यात येतील. त्यामुळे सदर दीक्षांत समारंभास इतर संलग्नीत महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित राहण्याची आवश्यकता/आग्रह नाही.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED
"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)
Established on 17th September 1994 Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

OFFICE OF THE DIRECTOR BOE&E

Website: srtmun.ac.in
E-mail: directorboee@srtmun.ac.in

Phone : (02462) 229294
Fax : (02462) 229520

सदर समारंभाच्या नियोजनासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात यावी.

१. महाविद्यालयाचे तथा मान्यता प्राप्त परिसंस्थेचे प्राचार्य/संचालक– अध्यक्ष

२. महाविद्यालय तथा मान्यताप्राप्त परिसंस्थेचा परीक्षा अधिकारी/प्रभारी प्राध्यापक–सदस्य सचिव

३. विद्यार्थी विकास विभाग, प्रभारी प्राध्यापक – सदस्य

४. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी – सदस्य

५. राष्ट्रीय छात्रसेना कार्यक्रमाधिकारी (असल्यास) –सदस्य

६. क्रीडा संचालक/क्रिडा विभागाचा विभागप्रमुख–सदस्य

७. महाविद्यालय विकास समितीचा(शैक्षणिक क्षेत्रातील)–सदस्य

८. विद्यार्थी संसदेचा सचिव (असल्यास) –सदस्य

१. समारंभाच्या स्थळी/सभागृहाच्या मंचाच्या पाठीमागील पडदयावर केवळ स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या इमारतीचा फोटो, स्वामीजींच्या पुतळयांच्या प्रतिमेसह विद्यापीठाचे बोधचिन्ह असावे.

२. पदवी वितरण समारंभ सुरु करण्यापुर्वी महाविद्यालयाच्या मुख्य प्रवेशव्दारापासुन प्रमुख अतिथी,प्राचार्य/संचालक,परीक्षा प्रमुख, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम २०१६ नुसार महाविद्यालय विकास समितीचे सदस्य, यांना घेवुन मिरवणूक आयोजित करावी व प्रमुख अतिथी यांचे पाठीमागे पदवी प्राप्त विद्यार्थी सहभागी असतील. मिरवणुकीच्या अग्रभागी विद्यापीठाचा ध्वज असावा. हा ध्वज महाविद्यालयातील परीक्षा विभाग प्रमुख तथा अधिकारी यांच्या हाती असावा.

॥ सा विद्या या विमुक्तये ॥
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED
"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)
Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade
OFFICE OF THE DIRECTOR BOE&E
Website: srtmun.ac.in
E-mail: directorboee@srtmun.ac.in
Phone : (02462) 229294
Fax : (02462) 229520

३. समारंभासाठी प्रमुख अतिथी म्हणुन शैक्षणिक क्षेत्रातील नावलौकीक असलेल्या व्यक्तींना बोलवावे.

४. सदर समारंभात पदवी प्रमाणपत्र वितरणाशिवाय इतर कोणत्याही प्रमाणपत्रांचे किंवा महाविद्यालय स्तरावरील बक्षिसांचा समावेश करण्यात येवु नये.

५. समारंभाच्या वेळी महाविद्यालयाच्या मुख्य प्रवेशव्दारापासुन निघणा—या मिरवणुकीतील सदस्यांचे आगमन झाल्यानंतर त्यातील सर्व सहभागी सदस्य आसनस्थ होईपर्यंत सभागृहातील/समारंभ मंडपातील सर्व उपस्थित व्यक्ती, पालक, विद्यार्थी आपापल्या जागी उभे राहतील व मिरवणुकीतील सर्व मान्यवर आसनस्थ झाल्यावरच आपल्या जागी बसतील. समारंभाचे औचित्य व पाविञ्य जपण्यासाठी हा दंडक कटाक्षाने पाळावा. सदर समारंभात सभागृहाचे आयोजन समितीला तशा स्पष्ट सुचना दयाव्यात.

६. समारंभाची बैठक व्यवस्था करण्यासाठी समिती गठीत करावी व समितीकडुन खालीलप्रमाणे बैठक व्यवस्था करावी.

अ) समारंभ मंचावर पहिल्या ओळीत प्रमुख अतिथी व प्राचार्य, मध्यभागी परीक्षा प्रमुख व मंचाच्या उजव्या बाजुला सी.डी.सी. अध्यक्ष किंवा त्यांचा प्रतिनिधी, त्यांच्या बाजुला विद्यार्थी संसदेचा सचिव मंचाच्या डाव्या बाजुना आसनस्थ होतील.

ब) मंचावर दुस—या ओळीत उपप्राचार्य,महाविद्यालयातील स्थानिक व्यवस्थापन समितीवरील एक प्राध्यापक - Barote

क) मंचाच्या समोर उजव्या बाजुला सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक व इतर मान्यवर आणि मंचाच्या डाव्या बाजुला माध्यमांचे प्रतिनिधी व त्यांच्या पाठीमागे पालक व इतर अतिथी आसनस्थ होतील.

ड) त्यानंतर सभागृहातील इतर पदवी प्राप्त करणारे सर्व विद्यार्थी अभ्यासक्रमनिहाय आसनस्थ करावेत.

इ) विशेष सन्मान, पारितोषिक, प्राप्त विद्यार्थी महाविद्यालयात असेल व त्याचा सन्मान विद्यापीठाने केला असला तरी एक अभिमानाची बाब म्हणुन संबंधीत

Phone : (02462) 229294

Fax : (02462) 229520

Website: srtmun.ac.in

E-mail: directorboee@srtmun.ac.in

विद्यार्थ्यांना निमंत्रन देता येईल व त्यांना मंचाच्या समोरील प्रथम रांगेत आसनस्थ करावेत.

७. पदवी प्रमाणपत्र प्राप्त करणारा विद्यार्थी/विद्यार्थीनी स्वत: उपस्थित राहुन पदवी प्रमाणपत्र मान्यवरांच्या हस्ते स्विकार करतील.

८. पदवी प्रमाणपत्र घेणा–या विद्यार्थ्यांसाठी विद्याशाखानिहाय प्रमाणपत्रांचे नियोजन करावे व त्यासाठी विज्ञान व तंत्रज्ञान, वाणिज्य व व्यवस्थापन, विद्याशाखा, मानव्य विद्याशाखा, आणि आंतरविद्याशाखा असा क्रम निश्चीत करावा.

९. पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभाची कार्यक्रम पत्रिका किमान चांगल्या दर्जाची असावी व त्यात पुढीलप्रमाणे कार्यक्रमाचे नियोजन करावे.

अ) पदवी प्रमाणपत्र समारंभ मिरवणूक महाविद्यालयाच्या मुख्य प्रवेशव्दारापासुन निघेल.

ब) मिरवणुकीचे समारंभस्थानी आगमन व दिप प्रज्वलन.

क)विद्यापीठ गीत (सांस्कृतिक विभागप्रमुख विद्यापीठ गीताबाबतचे नियोजन करतील) CD

ड) समारंभाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे परीक्षा विभाग प्रमुख करतील.

इ) प्रमुख अतिथींचे बीज भाषण

ई) अध्यक्षीय भाषण.

उ)पदवी प्रमाणपत्र वितरण

ऊ) आभार व्यक्त करणे व त्यानंतर राष्ट्रगीत होईल.

पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभानंतर मान्यवरांची मिरवणूक हि समारंभ स्थळी आलेल्या शिस्तीतच परत जाईल. त्यावेळी सभागृहातील सर्वांनी स्वत:च्या जागी उठुन उभे रहावे व मिरवणूक सभागृहाच्या बाहेर जाईपर्यंत प्रेक्षक जागा सोडणार नाहीत याची सूचना संचलन करणारे ध्वनीक्षेपामार्फत देतील. सदर मिरवणूक ज्या ठिकाणाहुन काढण्यात आली त्याच ठिकाणी मिरवणूकीची सांगता होईल.

8

॥ सा विद्या या विमुक्तये ॥

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)

Established on 17th September 1994 Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

**OFFICE OF THE DIRECTOR BOE&E**

Website: srtmun.ac.in

E-mail: directorboee@srtmun.ac.in

Phone : (02462) 229294

Fax : (02462) 229520

विशेष सूचना : सदर नियमावली शैक्षणिक वर्ष २०१९–२० पासुन लागू करण्यात यावी तसेच पदवी आवेदनपत्र चालु शैक्षणिक वर्षात ज्या विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र दयावयाचे आहेत त्याच विद्यार्थ्यांचे आवेदनपत्र महाविद्यालय स्तारावर घेण्यात यावेत. यापुर्वीच्या (जुन्या) सर्व विद्याशाखांची पदवी प्रमाणपत्रे विद्यापीठात आवेदनपत्र सादर करुन घेण्याबाबत सर्व संबंधीत विद्यार्थ्यांना कळविण्यात यावे.

महाविद्यालयाने पदवी प्रमाणपत्र वितरणाबाबतच्या एका रजिस्टरमध्ये अभ्यसक्रमनिहाय नोंदी ठेवाव्यात. सदर नोंद रजिस्टर व त्याचा अहवाल पदवी प्रमाणपत्र महाविद्यालयामधुन विद्यापीठाच्या दीक्षांत विभागात परत करतांना त्याचा सविस्तर अहवाल देणे आवश्यक आहे. तसेच महाविद्यालयांनी खालील तक्त्यामध्ये विद्यार्थ्यांची माहिती (Alumni) नोंद ठेवण्यात यावे, जेणेकरुन त्याचा उपयोग महाविद्यालयास वेळोवेळी होईल.

| अ.क्र. | विद्यार्थ्याचे नाव | पदवी | पत्ता | दुरध्वनी / भ्रमणध्वनी | ई–मेल |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

स्वाक्षरीत / —

संचालक

परीक्षा व मूल्यमापन मंडळ

6.1.2

9

# Azad Mahavidyalaya, Ausa.

## NOTICE

Date: 21/08/2021

All the Faculty members of senior college and ex-students are hereby informed that first degree distribution programme is scheduled on 29/08/2020 at 01.00 pm. All should attend observing corona guidelines.

Principal
Azad Mahavidyalaya Ausa
Dist. Latur

1) Dr. Shaikh S. B
2) Ingale B. D.
3) Dr. Kshirsagar D. D
4) Dr. Pade S. V.
4) शिंदे ए.जी.
5) Dr. Sayyed K. N.
6) Jawle V. V.
7) Bhoge D. G.
8) Mane A. C.
9) Dr. Salunke S. D
10) Dr. Tate D. S.
11) Badgire S. V.
12) Syed N. K.
13) Dr. Ladaf S. K
14) Patil S. M.
15) M. B. Zade
16) G. S. Chavan
17) Motegaonkar M. B.
18) Sarda Pooja
19) प्रा. गंगणे के.बी.
20) प्रा. निटूरे एन. डी.
21) M A Barote
22) शेलार एन. एम.
23) Shinde A. R.

6.1.2
1

10

# आझाद महाविद्यालय औसा.

**प्रहिला पदवी वितरण सोहळा**

दि.29/08/2020 स्थळ : ICT Hall वेळ दू : 1.00 वाजता

1.स्वागत समिती (TA/DA/निमंत्रण व आभार पत्र,निमंत्रण पत्रीका)

1. प्रा.जहागीरदार.टि.ए
2. प्रा.सुर्यवंशी आर.व्ही
3. प्रा.बरोटे एम.ए
4. प्रा.सय्यद एन.के
5. प्रा.सय्यद के.एन

2.बैठक व्यवस्था समिती (स्टेज व हॉलमधील बैठक व्यवस्था)

1. प्रा.मंगरुळे एम.एस
2. प्रा.माने ए.सी
3. प्रा.लदाफ एस.के

नियमानुसार

3.नांव नोंदनी व गाउन वाटप समिती (नांव नोंदनी , गाउन वाटप,इत्यादी)

1. प्रा.अचोले पी.बी
2. प्रा.शिंदे डी.ए
3. प्रा.झाडे एम.बी
4. प्रा.टिंगरे जी.डी
5. प्रा.पाटील मॅडम
6. प्रा.तोटे डी.एस
7. प्रा.दुरूगकर के.आर
8. श्री.मोरे डी.एम

4.स्टेज व डेकोरेशन समिती (Banner, पुष्पगुच्छ, ग्रंथ भेट )

1. प्रा.कोतवाल एम.एम
2. प्रा.पाटील एस.एन
3. प्रा.इनामदार एम.एम

5.फोटो /व्हीडीओ समिती (कार्यक्रमाचे फोटो /व्हीडीओ घेणे)

1. प्रा.शेख एस.बी
2. प्रा.जावळे व्ही.जी

6.प्रसीद्धी समिती ( कार्यक्रमाच्या पूर्वी व नंबर बातम्या देणे )

1. प्रा.भोगे.डी.जी
2. दुरूगकर के.आर

7.संपर्क समिती (विद्यार्थ्यांना संपर्क करून बोलावणे)

1. प्रा.अचोले पी.बी
2. प्रा.टिंगरे जी.डी
3. प्रा.तीळगुळे एन.बी

8.संचलन समिती (कार्यक्रमाची पत्रीका संचलन करणे )

1. प्रा.इनामदार एम.एम
2. प्रा.कोतवाल एम.एम
3. प्रा.गायकवाड व्ही.व्ही

9.चहापानी /अल्पोपहार समिती (विद्यार्थी व पाहूण्यासाठी अल्पोपहार व चहापान)

1. प्रा.पाडे.एस.व्ही
2. प्रा.पठाण ए.व्ही
3. प्रा.श्रीरसागर डी.डी

10.रांगोळी समिती (ICT Hall,प्रवेश द्वार इ.ठीकाणी रांगोळी )

1. प्रा.कोरडे एस.एस
2. प्रा.मोटेगावकर एम.बी

11.लाईट व माईक समिती (हॉल मध्ये लाईट व माईक व्यवस्था)

1. इंगळे बी.डी
2. ~~श्री.शेख एस.~~एस / साविद सय्यद

12.पदवी वाटप समिती (कार्यक्रम संपल्यानंतरआलेल्या विद्यार्थ्यांना पदवी देणे)

1. प्रा.इनामदार एम.एम
2. प्रा.दुरूगकर के.आर
3. प्रा.बाडगीरे एस.व्ही
4. श्री.देशमुख मुन्ना

28/8/20

AZAD MAHAVIDYALAYA, AUSA
Afsar Nagar, Ausa Tq.Ausa Dist.Latur
Affiliated To S.R.T.M.University Nanded, NAAC accredited B+

आझाद महाविद्यालय, औसा
अफसर नगर, औसा ता.औसा जि.लातूर

जा.क्र. AMA/2020-21/42

दिनांक. 27/08/2020

प्रति,
डॉ. पी.एन.सगर
प्राचार्य जयक्रांती महाविद्यालय लातूर.
तथा सिनेट सदस्य स्वा.रा.ती.म.विद्यापीठ नांदेड .

विषय — पदवी वितरण कार्यक्रमास विशेष निमंत्रीत म्हणून उपस्थित राहणे बाबत...

महोदय ,

वरिल विषयी आपणास विनंती करण्यात येते की , आमच्या महाविद्यालयाचा पहिला पदवी वितरण सोहळा दि.29/08/2020 रोजी दूपारी 1.00 वाजता (सोशल डिस्टंसींग सह) आयोजीत करण्यात आलेला आहे. या कार्यक्रमासाठी आपण विशेष निमंत्रीत म्हणून उपस्थित राहून पदवी वितरण करुन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे हि विनंती .

प्राचार्य
डॉ.ई.यू.मासुमदार
Principal
Azad Mahavidyalaya

फोन नं.02383- 220093,220276 फॅक्स नं.02383- 220093 इमेल,azadausa@yahoo.com

19

Reg.No. OSM/36/78 F 312 L.

Hindustani Education Society's

AZAD MAHAVIDYALAYA, AUSA

Afsar Nagar, Ausa Tq.Ausa Dist.Latur

Affiliated To S.R.T.M University Nanded, NAAC accredited B+

संस्था नोंदणी क्र.OSM/36/78 F 312 L

हिन्दुस्थानी एज्युकेशन सोसायटीचे

आझाद महाविद्यालय, औसा

अफसर नगर, औसा ता.औसा जि.लातूर

जा.क्र. दिनांक. / /

AMA/2020-21/41 27/08/2020

प्रति,
डॉ.महादेव गव्हाणे
प्राचार्य
रा.शा.म.(स्वायत्त.) लातूर.

विषय — पदवी वितरण कार्यक्रमाचे प्रमुख पाहूणे म्हणून उपस्थित राहणे बाबत...

महोदय ,

वरिल विषयी आपणास विनंती करण्यात येते की , आमच्या महाविद्यालयाचा पहिला पदवी वितरण सोहळा दि.29/08/2020 रोजी दूपारी 1.00 वाजता (सोशल डिस्टंसींग सह) आयोजीत करण्यात आलेला आहे. या कार्यक्रमासाठी आपण प्रमूख पाहूणे म्हणून उपस्थित राहून पदवी वितरण करुन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे हि विनंती .

28-8-2020

प्राचार्य
डॉ.ई.यू.मासुमदार
Principal
Azad Mahavidyalaya
Ausa Dist. Latur

फोन नं.02383- 220093,220276 फॅक्स नं.02383- 220093 इमेल azadausa@yahoo.com

निमंत्रण

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड

आणि हिंदुस्तानी एज्युकेशन सोसायटीचे

## आझाद महाविद्यालय, औसा.

द्वारा आयोजित

# पहिला पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ

**शनिवार दिनांक 29 ऑगस्ट 2020 दुपारी 1:00 वाजता.**

**अध्यक्ष**

**डॉ.अफसर शेख**
लोकनियुक्त नगराध्यक्ष,न.प.औसा व
सचिव, हिंदुस्तानी एज्युकेशन सोसायटी औसा

**प्रमुख पाहुणे**

**डॉ.महादेव गव्हाणे**
अभ्यास मंडळ सदस्य व
प्राचार्य राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त) लातूर

**विशेष निमंत्रित**

**डॉ.पी.एन.सगर**
सिनेट सदस्य व
प्राचार्य जयक्रांती महाविद्यालय लातूर

**प्रमुख उपस्थिती**

**प्रा.संजय कुलकर्णी**
अध्यक्ष,
हिंदुस्तानी एज्युकेशन सोसायटी औसा

**डॉ.इ.यु.मासूमदार**
प्राचार्य,
आझाद महाविद्यालय औसा

## यांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे
## तरी आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

**संयोजन समिती**

**प्रा.टी.ए.जहागीरदार**
उप प्राचार्य, आझाद महाविद्यालय औसा

**डॉ.एस.बी. शेख**
परीक्षा विभाग प्रमुख

**डॉ.एन.के. सय्यद**
समन्वयक, आयक्यूएसी

**डॉ.ए.सी.माने**
क्रीडा संचालक

**डॉ.एस.एस.चव्हाण**
कार्यक्रमाधिकारी, रासेयो

**प्रा.जी.डी. टिंगरे**
कार्यक्रमाधिकारी, रासेयो

**प्रा.एस.एन.पाटील**
प्रभारी, विद्यार्थी परिषद

S.R.T.M. UNIVERSITY, NANDED — स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड



16

हिंदुस्थानी एज्यूकेशन सोसायटी द्वारा संचलीत

# आझाद महाविद्यालय औसा.

पहिला पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ 2020

दि. 29/08/2020 ( बॅच 2018-19 ) वेळ : दू. 1.30 वाजता

**कार्यक्रम पत्रीका**

**अध्यक्ष** : डॉ.शेख ए.एन. साहेब (सचिव,हिंदुस्थानी एज्यूकेशन सोसायटी,औसा तथा नगराध्यक्ष नगर परिषद औसा)

**प्रमुख पाहूणे** : डॉ.महादेव गव्हाणे (प्राचार्य ,राजर्षी शाहू महाविद्यालय,लातूर)

**विशेष निमंत्रीत** : डॉ. पी.एन.सगर (प्राचार्य जयक्रांती महाविद्यालय लातूर)

- विद्यापीठ गीत
- दिप प्रज्वलन
- मान्यवरांचे स्वागत
- पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभाचे प्रास्ताविक : डॉ.एस.बी.शेख
- प्राचार्यांचे मनोगत
- प्रमुख पाहूण्यांचे मनोगत : डॉ.महादेव गव्हाणे सर
- विशेष निमंत्रीत पाहूण्यांचे मार्गदर्शन व मनोगत : डॉ. पी.एन.सगर सर
- अध्यक्षांचे मनोगत : डॉ.शेख ए.एन. साहेब
- मान्यवरांच्या हस्ते पदवी प्रमाणपत्र वितरण
- आभार : श्री . कोतवाल एम.एम. सर
- राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता

---

सूत्र संचलन : इनामदार एम.एम.

: कोतवाल एम.एम.

: गायकवाड व्ही.व्ही.

AZAD MAHAVIDYALAYA AUSA Dist




From Left : Prof Nizam , Secretary Dr Afsar Shaikh, Exam Chief ,Dr S B Shaik, Chief Guest Dr P N Sagar , Principal E U Masumdar while distributing Degree to Student on 29.8.2020



**Group Photo of Students who received their degrees on 29.8.2020.**

आदर्श गावकरी

AZAD MAHAVIDYALAYA AUSA Dist. LATUR

18

# आझाद महाविद्यालयात पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ

औसा /प्रतिनिधी

येथील आझाद महाविद्यालयाचा पहिला पदवी प्रमाणपत्र वितरण समरंभ सोशलडिस्टंसीगचे पालन करून मोठ्या उत्साहात शनिवार, दि.२९ ऑगस्ट रोजी संपन्न झाला, या समरंभाच्या अध्यक्षस्थानी हिंदुस्थानी एज्यूकेशन सोसायटीचे सचिव व औसा नगरीचे लोकनियुक्त नगराध्यक्ष डॉ. अफसर शेख तर प्रमुख पाहूणे म्हणून जयक्रांती महाविद्यालयाचे प्राचार्य व सिनेट सदस्य डॉ.पी.एन. सगर, प्राचार्य डॉ.महादेव गव्हाणे उपस्थित होते.



यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक परिक्षा विभाग प्रमुख प्रा.डॉ.शेख शहाजहान यांनी केले. याप्रसंगी प्राचार्य डॉ.ई.यू. मासुमदार, प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, प्राचार्य डॉ. पी.एन.सगर, नगराध्यक्ष डॉ.अफसर शेख यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी संस्था अध्यक्ष प्रा.संजय कुलकर्णी, सहसचिव गजाला अरब, संस्था सदस्य परवीन शेख, जावेद शेख, अजीम कनिहाले, प्राचार्य निजामोद्दीन शेख, सदस्य पांचाळ, उपप्राचार्य जहागीरदार आदि उपस्थित होते. या समारंभात २२ विद्यार्थ्यांनी उपस्थित राहून पाहूण्यांच्या हस्ते पदवी प्रमाणपत्र स्विकारले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रा. इनामदार व प्रा. व्ही. व्ही. गायकवाड यांनी तर आभार प्रा.एम.एम. कोतवाल यांनी मानले.

Auranagabad Edition
1 Sep, 2020 Page No. 5
Powered by : erelego.com

आदर्श गावकरी — 01/09/2020

# आझाद महाविद्यालयाचा पहिला पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ संपन्न




औसा/प्रतिनिधी :

औसा येथील आझाद महाविद्यालयाचा पहिला पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ सोशलडिस्टंसीग चे पालन करुन मोठ्या उत्साहात शनिवार दि.२९/०८/२०२० रोजी संपन्न झाला. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी हिंदुस्थानी एज्युकेशन सोसायटीचे सचिव व औसा नगरीचे लोकनियुक्त नगराध्यक्ष डॉ.अफसर शेख साहेब तर प्रमुख पाहुणे म्हणून जयक्रांती महाविद्यालय लातूर चे प्राचार्य व सिनेट सदस्य डॉ.पी.एन.सगर आणि राजर्षी शाहू महाविद्यालयाचे प्राचार्य व राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ.महादेव गव्हाणे (ऑनलाईन) उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात सर्व प्रथम विद्यापीठ गीत व दीप प्रज्वलनाने झाली यानंतर मान्यवरांचे स्वागत करण्यात आले कार्यक्रमाचे प्रास्ताविक परीक्षा विभाग प्रमुख प्रा.डॉ.शेख शाहजहान यांनी केले नंतर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ई.यू.मासुमदार यांनी महाविद्यालयाच्या प्रगतीचा आढावा सादर करताना यामध्ये त्यांनी महाविद्यालयातर्फे राबविण्यात येणा-या विविध उपक्रम शैक्षणिक सोयी सुविधांची माहिती दिली यानंतर प्रमुख पाहुणे मा.प्राचार्य डॉ.महादेव गव्हाणे यांनी आपले मार्गदर्शनपर विचार व्यक्त करताना सांगितले की,देशाला महासत्ता बनविण्याची ताकद आजच्या तरुणांमध्ये आहे जगात सर्वाधिक तरुण भारतात आहेत त्यांचा योग्य ठिकाणी उपयोग केल्यास देश निश्चितच महासत्ता बनेल. रोजगाराच्या आज अनेक संधी देशात उपलब्ध आहेत त्यासाठी आपल्यात गुणवत्ता असायला हवी आजचा अभ्यासक्रम देखील बदलला पाहिजे व कौशल्याभिमुख शिक्षणावर भर दिला जावा असे ते म्हणाले. या नंतर प्राचार्य डॉ.पी.एन.सगर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना २१ वे शतक हे ज्ञानी माणसांचे आहे विद्वान लोक ज्या राष्ट्रात जास्त तेच राष्ट्र आगामी काळात महासत्ता बनेल संपुर्ण जगाला ज्ञानी माणसं पुरविण्याचे सामर्थ्य भारतामध्ये आहे त्याच प्रमाणे विद्यार्थ्यांनी नेहमी सकारात्मक दृष्टीकोन बाळगणे गरजेचे आहे असे नमूद केले.

अध्यक्षीय समारोप करताना नगराध्यक्ष डॉ.अफसर शेख म्हणाले की,आमच्या महाविद्यालयातुन चांगली गुणवत्ता पूर्ण व कौशल्यनिपूण विद्यार्थी घडावेत यासाठी आमचा सातत्याने प्रयत्न आहे आगामी काळात महाविद्यालयात कॅम्पस मुलाखतींची सोय उपलब्ध करणे,तसेच करिअर मार्गदर्शन केंद्र सुरु करणार असल्याचे सांगितले व विद्यार्थ्यांना भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमासाठी संस्था अध्यक्ष प्रा.संजय कुलकर्णी ,सहसचिव गजाला अरब,नगर सेविका परवीन शेख,नगर सेवक जावेद शेख,प्राचार्य निजामोद्दीन शेख,संचालक पांचाळ सर,उपप्राचार्य जहागीरदार टी.ए.महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते या समारंभात एकूण २२ विद्यार्थ्यांनी उपस्थित राहून पाहुण्यांच्या हस्ते पदवी प्रमाणपत्र स्विकारले व तदनंतर कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली .

कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रा.इनामदार एम.एम. व

प्रतिवाहिर — ०१/०९/२०२०

...USA Dist. LATUR

Reg.No. OSM/36/78 F 312 I.
Hindustani Education Society's
**AZAD MAHAVIDYALAYA, AUSA**
Afsar Nagar, Ausa Tq.Ausa Dist.Latur
Affiliated To S.R.T.M.University Nanded, NAAC accredited B+

संस्था नोंदणी क्र.OSM/36/78 F 312 I.
हिन्दुस्थानी एज्युकेशन सोसायटीचे
**आझाद महाविद्यालय, औसा**
अफसर नगर, औसा ता.औसा जि.लातूर
स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड संलग्नीत, नॅक प्रमाणित बी + दर्जा प्राप्त

जा.क्र. AMA/2020-21/ 41

दिनांक. 29/08/2020

# आभार पत्र

प्रति,
डॉ. पी.एन.सगर
प्राचार्य जयक्रांती महाविद्यालय लातूर.
तथा सिनेट सदस्य स्वा.रा.ती.म.विद्यापीठ नांदेड .

आझाद महाविद्यालय औसा येथे दि. 29/08/2020 रोजी संपन्न झालेल्या पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभास आपण प्रमुख पाहूणे म्हणून उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व कार्यक्रमाची शोभा वाढवली त्या बद्दल आपले हार्दिक आभार.

Received
29/8/20

O/C

डॉ.इ.यू.मासुमदार
प्राचार्य
Principal
Azad Mahavidyalaya
Ausa Dist. Latur

फोन नं.02383- 220093,220276 फॅक्स नं.02383- 220093 इमेल azadausa@yahoo.com.

Reg.No. OSM/36/78 F 312 L

Hindustani Education Society's

AZAD MAHAVIDYALAYA, AUSA

Afsar Nagar, Ausa Tq.Ausa Dist.Latur

Affiliated To S.R.T.M.University Nanded, NAAC accredited B+

संस्था नोंदणी क्र.OSM/36/78 F 312 L

हिन्दुस्थानी एज्युकेशन सोसायटीचे

आझाद महाविद्यालय, औसा

अफसर नगर, औसा ता.औसा जि.लातूर

जा.क्र. AMA/2020-21/ 40

दिनांक. 29/08/2020

## आभार पत्र

प्रति,
डॉ.महादेव गव्हाणे,
प्राचार्य,
रा.शा.म.( स्वायत्त) लातूर.

आझाद महाविद्यालय औसा येथे दि. 29/08/2020 रोजी संपन्न झालेल्या पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभास आपण प्रमुख पाहूणे म्हणून उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व कार्यक्रमाची शोभा वाढवली त्या बद्दल आपले हार्दिक आभार.

डॉ.ई.यु.मासुमदार
प्राचार्य
Principal
Azad Mahavidyalaya
Ausa Dist. Latur

O/C

फोन नं.02383- 220093,220276 फॅक्स नं.02383- 220093 इमेल azadausa@yahoo.com